| MHAH300007732020 | दाखल तारीख | : | २५/०४/२०२२ |
|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | : | २९/०४/२०२२ |
| | निकाल तारीख | : | ११/०३/२०२५ |
| | कालावधी | : | व. म. दि.<br>०२ १० १६ |

**भाग 'अ'**

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, राहाता, तालुका - राहाता, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात : पिठासीन अधिकारी - यो. ही. आमेटा यांचे समोर**

**सत्र खटला क्र. १९९/२०२४** **नि. क्र. ६३.**
**(जुना सत्र खटला क्र. ३४/२०२२)**

**प्रथम खबर अहवाल क्रमांक : ४१०/२०२१**

**गुन्हा : भारतीय दंड विधान कलम ३०४ व ३२६ सहकलम ३४ अन्वये.**

**पोलीस ठाणे : लोणी पोलीस ठाणे, ता. राहाता, जि. अहमदनगर.**

| | |
|---|---|
| तक्रारदार | महाराष्ट्र राज्य, |
| यांच्या वतीने | विद्वान अतिरिक्त सरकारी अभियोक्ता<br>**श्री. बी. डी. पानगव्हाणे.** |
| आरोपी | **१. स्वाती विश्वनाथ घोरपडे,**<br>वय - ३५ वर्ष, कामधंदा - शेत मजुर,<br>रा. जांभळीचा मळा, निर्मळ पिंप्री,<br>ता. राहाता, जि. अहमदनगर.<br><br>**२. अर्जुन लक्ष्मण वाघे,**<br>वय - ४७ वर्ष, कामधंदा - शेत मजुर,<br>रा. केलवड, राहाता,<br>ता. राहाता, जि. अहमदनगर. |
| यांच्या वतीने | विद्वान विधिज्ञ **श्री. एस. बी. जगताप.** |

## भाग 'ब'

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १८/१०/२०२१ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | १९/१०/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | २५/०४/२०२२ |
| दोषारोपपत्र वर्ग केल्याची तारीख | १२/०४/२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | २०/०२/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १४/०२/२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णय सुनावल्याची तारीख | ११/०३/२०२५ |
| शिक्षा सुनावल्याची तारीख, जर सुनावलीस | -- |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक केल्याची तारीख | जामिनावर सोडल्याची तारीख | निश्चित केलेले दोष | दोषमुक्त की दोषसिध्द | सुनावलेली शिक्षा | फौ.प्र.सं. चे कलम ४२८ अन्वये शिक्षा माफीस पात्र असल्यास, संपरीक्षे-दरम्यान व्यतीत केलेला तुरुंगवास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स्वाती विश्वनाथ घोरपडे | १९/१० /२०२१ | १८/११/ २०२१ | भा.दं.वि. कलम ३०४ व ३२६ सहकलम ३४ अन्वये. | दोषमुक्त | -- | -- |
| २. | अर्जुन लक्ष्मण वाघे | १९/१० /२०२१ | १८/११/ २०२१ | भा.दं.वि. कलम ३०४ व ३२६ सहकलम ३४ अन्वये. | दोषमुक्त | -- | -- |

## न्यायनिर्णय
## ( घोषीत दिनांक ११/०३/२०२५ )

१. सदरचे अभियोजन, नमुद आरोपी याचे विरुध्द, वर नमूद करण्यात आलेल्या गुन्हया अंतर्गत चालविण्यात येत आहे.

**<u>अभियोग पक्षाने आरोपीं विरुध्द खालीलप्रमाणे नमूद तत्वानुषांगाने सदरचा खटला चालविला आहे</u>** :

२. मयत विश्वनाथ घोरपडे यांच्या मुलगा कार्तिक घोरपडे याने दि. १९.१०. २०२१ रोजी फिर्याद दिली की, दिनांक १७.१०.२०२१ रोजी त्याच्या भाउ ओम हा गोचीड ताप व डेंग्युमुळे आजारी असल्यामुळे, त्याला पीएमटी, हॉस्पिटल लोणी येथे दाखल करण्यात आले होते. त्यावेळी त्याच्या भावासोबत त्याची आई आरोपी क्र. १ स्वाती घोरपडे रुग्णालयात हजर होती. फिर्यादीचे वडील विश्वनाथ घोरपडे हे फिर्यादीकडे दारु पिण्यासाठी दहा हजार रुपये मागत होते व ते न दिल्यामुळे त्याचे वडीलांनी त्याला मारहाण केली व दगड घेवुन त्याच्या मागे गेले. भितीपोटी फिर्यादी हा शेजारचे डाळींबाचे बागेत लपुन बसला होता.

३. दुस-या दिवशी दि. १८.१०.२०२१, सकाळी ०७:०० वाजता फिर्यादी घरी आला असता, त्याची बहिण रडत होती व तिने सांगितले की, तिचे वडील विश्वनाथ याने रात्री तिच्या अंथरुणावर येवुन, तिच्या छातीला हात लावुन, तिच्याशी अश्लील चाळे केले व तिच्याशी जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. सदर घटनेनंतर देखील फिर्यादीचे वडील विश्वनाथ याने त्याच्या आईशी भांडण करीत होता व घाणघाण शिवीगाळ करीता होता. त्यामुळे दि. १८.१०.२०२१ रोजी रात्री ११:३० वाजताचे सुमारास फिर्यादीची आई आरोपी क्र. १ स्वाती घोरपडे व मामा आरोपी क्र. २ अर्जुन वाघे यांनी विश्वनाथ याचे हात व पाय घरातील बाजावर बांधले. आरोपी स्वाती व अर्जुन यांनी विश्वनाथ याचे पायावर लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्यामुळे विश्वनाथ यास गंभीर मार लागला होता, त्याला तसेच बांधुन ठेवले व दवाखान्यात उपचारासाठी नेले नाही. सदर मारहाणीमुळे फिर्यादीचा वडिलांचा मृत्यु झाला. करीता फिर्यादी कार्तिक याचे तक्रारीवरुन, गु.र.नं. ४१०/२०२१, भां.द.वि. कलम ३०४ व ३२६ सहकलम ३४ अन्वये नोंदविण्यात आला.

४. सदर गुन्हयाचा तपास, तपास अधिकारी पोलीस उपनिरिक्षक योगेश शिंदे यांनी केला. त्यांनी तपासादरम्यान, दि. १९/१०/२०२१ रोजी त्यांनी प्रवरा रूग्णालयातुन मृत्युचा अहवाल नि. ३९ मेमो क्रमांक ८२९ प्राप्त केला व पत्र दि. १९/१०/२०२१ नि. ४९ देवुन वैद्यकीय अधिकारी, प्रवरा रूग्णालय यांना शवविच्छेदन करून त्याचा अहवाल देण्याची विनंती केली व शवविच्छेदन अहवाल नि. ३३ प्राप्त करुन तपासाचे कागदपत्रात सामील केला. तसेच मरणोत्तर पंचनाम नि. ३४ देखील तयार केला. घटनास्थळ

पंचनामा नि. ३२ तयार केला, घटनास्थळाचे एकुण आठ फोटो काढले, मयताचे अंगावरील कपडे जप्त करुन त्याच्या पंचनामा नि. २९ केला, तसेच दोन्ही आरोपींचे कपडे जप्त करुन त्याच्या पंचनामा नि. ३० व ३१ केला व जप्त केलेल्या सर्व वस्तु मुददेमाल कारकुनाकडे जमा केले व त्याबाबतचे पावत्या घेतल्या.

५. सदर तपास अधिकारी यांनी पुढे साक्षीदांराचे जबाब नोंदविले, फिर्यादीचा फौ. प्र.सं. कलम १६४ प्रमाणे जबाब नोंदवुन घेतला, जप्त मुददेमाल व मयताचा व्हिसेरा रासायनिक पृथकरणासाठी, प्रयोगशाळा नाशिक येथे पाठविले, संबंधित भ्रमणध्वनींचे सीडीआर / एसडीआर मिळणेकरीता अप्पर पोलीस अधिक्षक, श्रीरामपुर यांना पत्र नि. ५४ दिले, त्यानंतर सदर सीडीआर / एसडीआर अभिलेखावर दाखल केले, घटनास्थळाचे ७/१२ उतारा नि. ५५ हस्तगत केला, मयत विश्वनाथ विरुध्द नोंदविलेली फिर्याद क्र. ४०९/२०२१ ची नक्कल प्राप्त करुन घेतली, प्रयोगशाळेतुन प्राप्त झालेले अहवाल दोषारोपपत्रात सामिल केले. तपासअंती आरोपीं विरुध्द पुरेसा पुरावा आढळल्याने, न्यायालयात त्यांच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल करुन, तपास पूर्ण केला.

६. आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानचे कलम ३०४ व ३२६ सहकलम ३४ अन्वये दोषारोप (नि. १४) निश्चित करुन ते, आरोपींना मराठी भाषेत वाचून व समजावून सांगितले असता, आरोपींनी त्यांचे निवेदन (नि. १५ व १६) अन्वये दोषारोप नाकारले व गुन्ह्याशी काहीएक संबंध नाही व खोटया गुन्हयात गुंतवल्याचा बचाव घेउन, अभियोजना समोर जाण्याची तयारी दर्शविली.

७. अभियोग पक्षाचा पुरावा पूर्ण झाल्यावर, त्यामधील आरोपींविरुध्द आलेल्या तथ्यांचा खुलासा देण्याची संधी आरोपींना, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये देण्यात येउन, आरोपींचे सदरचे जबाब नि. क्र. ६१ व ६२ वर नोंदविण्यात आले. आरोपींनी त्यांच्या बचावात सदर तथ्यांची सत्यता नाकारुन सदर गुन्हयात त्यांना खोटेपणाने गुंतविण्यात आल्याचा बचाव घेतला.

८. विद्वान अतिरिक्त सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकून, सदर प्रकरणात अभिलेखावर आलेला पुराव्यानुसार, उत्पन्न झालेले मुद्दे व त्यावरील कारणमिंमासेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, विश्वनाथ सखाराम घोरपडे यांचा मृत्यु हा मनुष्यवध म्हणजेच हत्या होती ? | **...आहे.** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दिनांक १८/१०/२०२१ रोजी रात्री ११:०० ते ११:३० वाजता सुमारास, मयत विश्वनाथचे घरात, जाभंळी मळा, निर्मल पिंप्री गावात, ता. राहाता, जि. अहमदनगर, आरोपी क्र. १ व २ ने समान उद्देशाने संगनमत करुन, मयत विश्वनाथ सखाराम घोरपडे यास लोखंडी बाजला बांधुन, त्यांच्या पायावर लाकडी दांडयाने मारहाण करुन खुन या सदरात न मोडणारा मनुष्यवध करुन अपराध केला व या प्रमाणे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम, १८६० चे कलम **३०४** सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही.** |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त नमूद कालावधीत आणि ठिकाणी, आरोपी क्र. १ व २ ने समान उद्देशाने संगनमत करुन, मयत विश्वनाथ सखाराम घोरपडे यांना लाकडी दांडयाने मारहाण करुन, मृत्यु होण्यासारखी गंभीर दुखापत केली आणि त्याद्वारे, आरोपींनी, भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम **३२६** सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही.** |
| ४. | आदेश काय ? | **...आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

**: <u>का रण मि मां सा</u> :**

९. विद्वान अतिरीक्त सरकारी अभियोक्ता यांनी युक्तिवाद केला की, मरणोत्तर पचंनामा नि. ३४ व शवविच्छेदन अहवाल नि. ३३ पाहता, विश्वनाथ घोरपडे यांचा मृत्यु त्यांना झालेल्या मारहाणीमुळे व अंगावर झालेल्या जखमामुळे झाल्याचे दिसुन येत आहे. विद्वान सरकारी वकीलांनी युक्तीवाद केला की, सदरची बाब बचाव पक्षाने विवादित केले नाही, करीता विश्वनाथ घोरपडे यांचा मृत्यु ही नैसर्गिक किंवा आकस्मिक किंवा अपघाती नसुन, तो फक्त मनुष्यवध म्हणजेच खुन या सदरात न मोडणारा अपराध केला आहे.

१०. विद्वान सरकारी वकीलांनी पुढे युक्तीवाद केला की, जरी सा. क्र. १ ते ४ यांनी त्यांनी दिलेली फिर्याद व दिलेले जबाबाशी विसंगत असा जबाब दिला असेल तरी,

सदरची फिर्यादीतील मजकुर सा. क्र. ५ ठाणे अंमलदार सहा. फौजदार यांचे मार्फत सिध्द झाले आहेत.

११. विद्वान सरकारी वकीलांनी पुढे युक्तीवाद केला की, फिर्यादी सा. क्र. १, त्याची बहिण सा. क्र. २, सा. क्र. ३ व ४ मयताचे भाऊ यांनी देखील त्यांचे आधीचे जबाबांशी विपरीत अशी साक्ष दिली असेल तरी, या साक्षीदांराचे जबाब तपास अधिकारी सा. क्र. ६ पो. उपनि. शिंदे यांनी नोंदविलेले होते व शिंदे यांनी त्यांच्या साक्षीत सदरची बाब स्पष्टपणे सांगितली व या साक्षीदारांचे पुर्वीचे जबाब सिध्द् केले आहेत. याप्रमाणे सरकारी वकीलांनी युक्तीवाद केला की, जरी हे साक्षीदार साक्षीवेळी अभियोजनास सहकार्य केले नसले तरी, त्यांनी तपासा दरम्यान दिलेले जबाब, तपास अधिकारी यांच्या साक्षीत सिध्द् झाले आहेत.

१२. याप्रमाणे, सरकारी वकीलांनी युक्तीवाद केला की, की जरीही सदर महत्वाचे साक्षीदारा यांनी, त्यांच्या आधीचे जबाबाशी विसंगत अशी साक्ष दिली असेल, तरीही घटनेची बाब, ठाणे अंमलदार फटागंरे व तपास अधिकारी शिंदे यांचे साक्षीमधुन सिध्द होते. सरकारी वकीलांनी पुढे युक्तीवाद केला की, जर अशी कुठली घटना घडली नसती तर, फिर्यादी सा. क्र. १ कार्तिक याला आरोपी त्याची आई व मामा यांच्याविरुध्द तशी तक्रार देण्याचे काहीही कारण नव्हते. ज्याअर्थी, आरोपींचे नावानिशी तक्रार देण्यात आली आहे, त्याअर्थी सदर फिर्यादमध्ये नमुद असल्याप्रमाणे ती घटना घडल्याचे व त्यामध्ये आरोपींचा सहभाग असल्याचे स्पष्टपणे सिध्द होते. सरकारी वकीलांनी पुढे युक्तीवाद केला की ज्याअर्थी, फिर्याद दिले नंतर त्वरीत आरोपीं यांना अटक करण्यात आली, त्याअर्थी सदर आरोपींनी हा गुन्हा केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते व फिर्याद नि. २३अ, व इतर साक्षीदारांचे जबाब, तपास अधिकारी श्री. शिंदे यांचे मार्फत सिध्द झालेचे पाहता, आरोपीं यांनी सदरचा गुन्हा केल्याचे गृहित धरावे लागणार व त्यांना कठोर शिक्षा होणे गरजेचे आहे.

१३. याविपरीत, बचाव वकीलांनी युक्तीवाद केला की, कुठल्याही आरोपीचा सदर गुन्हयाशी काही संबंध नसुन त्यांना खोटे गुंतविण्यात आले आहे. बचाब वकीलांनी युक्तीवाद केला की, मयताचे मृत्युचे कारण जरी मारहाणीमुळे असेल तरी, ते याच आरोपींनी विश्वनाथ घोरपडे यांना मारहाण करुन तशी जखम केल्याचे, अभियोजन पक्षाने संशयापलीकडे सिध्द करणे गरजेचे असुनही, तसा कुठलाही पुरावा अभिलेखावर आला नाही.

१४. बचाव पक्षाचे वकीलांनी पुढे युक्तीवाद केला की, अभियोजन पक्षाने सा.क्र. १ कार्तिक व सा. क्र. २ वैष्णवी हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणुन तपासले आहेत, तरीही या दोन्ही साक्षीदांरानी सदर मारहाणीची घटना त्यांना माहित नसल्याचे त्यांनी साक्षीत स्पष्ट सांगितले आहे. सा. क्र. १ कार्तिक याने तर फिर्याद नि. २३अ मधील तक्रार मजकुर सांगितल्याचे देखील न्यायालयासमोरील साक्षीमध्ये सप्ष्ट नाकारले आहे. तसेच बचाव वकीलांनी पुढे युक्तीवाद केला की, सा. क्र. ३ रावसाहेब व सा. क्र. ४ दादासाहेब हे मयताचे भाऊ असुन त्यांची साक्ष ही ऐकीव माहितीवर आधारीत आहे व त्यांनी देखील असे कुठलेही जबाब दिल्याचे नाकारल्याने, सदरची फिर्याद व इतर पुर्वीचे जबाब साक्षीमध्ये सिध्द झाले असेल तरी ते आरोपींविरुध्द वाचता येणार नाही. बचाव वकीलांनी युक्तीवाद केला की, ज्याअर्थी साक्षीदारांनी सदर मारहाण याच आरोपींनी केल्याचे स्पष्ट नाकारल्याने, तपासा दरम्यान नोंदविण्यात आलेले त्यांचे आधीचे कुठलेही जबाबात तथ्य उरत नाही.

१५. याप्रमाणे बचाव वकीलांनी युक्तीवाद केला की, निव्वळ ठाणे अंमलदार व तपासी अधिकारी यांचे साक्षींवर विसंबुन आरोपींनी गुन्हा केल्याचे गृहित धरता येणार नाही व तसे सिध्दही होत नाही. याप्रमाणे बचाव वकीलांनी युक्तीवाद केला की, आरोपींविरुध्द कुठलाही गुन्हा शंकेपलीकडे सिध्द होत नसल्यामुळे, त्यांना निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होईल. सबब, त्यांनी आरोपींना मुक्त करण्याची विनंती केलेली आहे.

**मुद्दा क्र. १ करिता :**

१६. प्रस्तुत अभियोजनामध्ये आरोपी यांनी मयत विश्वनाथ घोरपडे यास लोखंडी बाजला बांधुन, लाकडी दांडयाने जबर मारहाण केली व त्या मारहाणीतुन झालेल्या जखमांमुळे त्यांचा मृत्यु झाला असल्याचे आरोप असल्याने, सर्व प्रथम हे सिध्द करणे गरजेचे आहे की, विश्वनाथ घोरपडे यांचा मृत्यु हा नैसर्गिक, आकस्मिक, अपघाती किंवा मनुष्यवधामुळे होता किंवा कसे.

१७. मरणोत्तर पंचनामा नि. ३४ व शवविच्छेदन अहवाल नि. ३३ पाहता मयत विश्वनाथ घोरपडे याच्या शरिरावर मारहाणीचे जखमा असल्याचे स्पष्ट होते. तसेच शवविच्छेदन अहवाल नि. ३३ पाहता विश्वनाथ यांच्या मृत्यु मारहाणीमुळे झाल्याचे स्पष्ट होत आहे. सदरचा मरणोत्तर पंचनामा नि. ३४ व शवविच्छेदन अहवाल नि. ३३, हे बचावपक्षाने काही फारसे विवादीत केलेले नाही. तसेच विश्वनाथ घोरपडे यांचा मृत्यु हा नैसर्गिक किंवा

किंवा आकस्मिक होता, असा कुठलाही बचाब मांडण्यात आला नाही व तसा कुठलाही पुरावा अभिलेखवर आला नाही. जरी बचाव पक्षाने विश्वनाथ घोरपडे याचा मृत्यु हा अपघाती असल्याचा बचाव मांडला असेल, तरी त्या बचावाचे पृष्ठयर्थ काहीही पुरावा अभिलेखावर आणुन ती बाब सिध्द केलेली नसल्यामुळे, विश्वनाथ घोरपडे याचा मृत्यु हा नैसर्गिक किंवा अपघाती किंवा आकस्मिक नसुन केवळ मनुष्यवध असल्याचे सिध्द होते, **करीता, मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.**

**उर्वरीत दोन्ही मुददयांकरिता :**

सर्व मुददे एकमेकांशी निगडीत असल्याने, ते एकत्रच विचारात घेण्यात आले आहेत.

१८. आरोपी स्वाती घोरपडे व अर्जुन वाघे विरुध्द अभियोजन पक्षाने असे दोषारोप मांडले आलेत की, दिनांक १८/१०/२०२१ रोजी, रात्री ११:०० ते ११:३० वाजता सुमारास, मयत विश्वनाथचे घरात, जाभंळी मळा, निर्मल पिंप्री गावात, ता. राहाता, जि. अहमदनगर येथे, आरोपी क्र. १ व २ ने समान उद्देशाने संगनमत करुन, मयत विश्वनाथ सखाराम घोरपडे यास लोखंडी बाजला बांधुन, त्यांच्या पायावर लाकडी दांडयाने मारहाण करुन मनुष्यवध करुन खुन या सदरात न मोडणारा अपराध केल्याचे मत अभियोजन पक्षाने मांडले आहे. याअनुषंगाने, आरोपीं विरुध्द निश्चित करण्यात आलेले दोषारोपातील सर्व तथ्य अभियोगपक्षाने शंकेपलिकडे सिध्द करणे गरजेचे आहे.

१९. याअनुषंगाने अभियोजन पक्षाचे साक्षीदारांनी साक्षीमध्ये दिलेले जबाब पाहता, सा.क्र. १ कार्तिक, सा.क्र. २ वैष्णवी, सा.क्र. ३ रावसाहेब व सा. क्र. ४ दादासाहेब यांचे जबाब, त्यांचे पोलीस तपासादरम्यान दिलेल्या जबाबाशी विसंगत अशी साक्ष, शपथेवर न्यायालयासमोर सांगितली आहे. सा. क्र. ३ रावसाहेब व सा. क्र. ४ दादासाहेब यांनी सदर घटना पाहिल्याचे नाकारले आहे. तसेच त्यांनी त्यांच्या भाउ विश्वनाथला याच आरोपींनी खाटीला बांधल्याचे व त्याच्या पायाला लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची माहिती त्यांना मिळाल्याचे देखील नाकारले आहे.

२०. महत्वाचे व प्रत्यक्षदर्शी सा. क्र. १ कार्तिक व सा. क्र. २ वैष्णवी यांची साक्ष पाहता, ते मयताचे मुले असल्याचे साक्षीमधुन सिध्द होते. सदर साक्षीदारांनी त्यांच्या पोलीसांसमोरील जबाबाचे विपरीत असा जबाब दिल्याचे दिसुन येत आहे. त्यांच्या साक्षीवरुन

असे दिसुन येते की, घटनेच्या दिवशी दोन ते तीन अनोळखी इसमांनी त्यांच्या वडिलांनी घराकडे आणले होते. त्यांचे वडील खुप दारु प्यायले असल्याचे त्यांना समजले व ते काही अंतरावर रस्त्याच्या बाजुला पडले असुन ते वेदनेने विव्हळत होते व घर जवळच आहे, मला घरी सोडा अशी त्यांनी त्या अनोळखी लोकांना विनंती केली होती. त्यांनी पुढे सरतपासात कथन केले की, वडिलांना विचारल्यावर ते, जास्तच दारू प्यायले असल्याचे त्यांना समजले व ते शिवीगाळ करत, 'धडक दिली, त्याने मारले' असे सांगत होते. मग त्यांनी वडीलांना खाटेवर झोपवले. तसेच वडील सतत उठण्याचा प्रयत्न करत होते व त्यामुळे दोनदा खाटेवरून पडले व ते अजुन जोरजोराने विव्हळत होते. म्हणून त्यांना अजुन त्रास होवू नये व खाटेवरून पडु नये म्हणून त्यांनी त्यांचे हात खाटेला बांधले होते.

२१. यास्तव, सरकारी वकीलांनी घेतलेला या साक्षीदाराचा सखोल उलटतपासामध्येही, सा. क्र. १ कार्तिक व सा. क्र. २ वैष्णवीने सदर मारहाणीची घटना पाहिल्याचे, आरोपींनी त्याचे वडील विश्वनाथ यास खाटीला बांधुन, लाकडी दांडयाने पायावर मारल्याचे अशी साक्ष किंवा कुठलेही कबुली जबाब, त्यांच्या उलटतपासामधुन उघडकीस आणण्यात सरकारी वकीलांना यश आले नाही. करीता मुळ फिर्यादी सा. क्र. १ कार्तिक व त्याची सा. क्र. २ वैष्णवी यांची साक्ष, आरोपींवर निश्चित करण्यात आलेले दोषारोपामधील एकही दोष सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

२२. तसेच सा. क्र. १ कार्तिकने अशी कुठल्याही मजकुराची फिर्याद आरोपीं विरुध्द दिल्याचे नाकारले आहे. तसेच अशा मजकुराचा, फौ.प्र.सं. चे कलम १६४ प्रमाणेचा जबाबात त्याने काही सांगितल्याचे देखील नाकारले आहे. अशा परिस्थितीत, सा. क्र. १ कार्तिक हा मुळ फिर्यादी असुन त्याने दिलेली फिर्याद नि. २३अ, फौ. प्र. सं. चे कलम १६४ प्रमाणे जबाब नि. ५७, त्याचे पुर्वीचे जबाबाशी विसंगत अशी साक्ष देवुन, अभियोजन पक्षास सहकार्य केले नाही.

२३. सा. क्र. ३ रावसाहेब व सा. क्र. ४ दादासाहेब हे मयताचे सख्खे भाऊ असुन त्यांनी अभियोजन पक्षास सहकार्य होईल अशी साक्ष दिली नाही व आपल्या आधीच्या जबाबाशी विसंगत अशी साक्ष दिली आहे. तसेच तथाकथीत मारहाणीची बाब ही त्यांची ऐकीव माहिती होती. यामुळे सरकारी वकीलांनी घेतलेली या साक्षीदारांच्या सखोल उलटतपासातही, त्यांनी सदर घटना पाहिल्याचे, मयत विश्वनाथने मुलगी वैष्णवी सोबत अश्लील कृत्य

केल्याचे, व त्यामुळे आरोपींनी विश्वनाथ यास खाटेवर बांधल्याचे व त्याला लाकडी दांडयाने मारहाण केल्याचे नाकारले आहे. करीता त्यांची साक्ष, आरोपींवर निश्चित करण्यात आलेले दोषारोपामधील एकही दोष सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षास काहीएक उपयोगी पडत नाही. अशा परिस्थितीत, मयत विश्वनाथ याचे मृत्युस सदर आरोपी कारणीभुत असल्याचे किंवा त्यांनी लाकडी दांडक्याने मारुन जखम केल्याचे, सिध्द होत नाही.

२४. जरीही, मरनोत्तर पंचनामा नि. ३४, शवविच्छेदन अहवाल नि. ३३, आहेत तशा परिस्थितीत वाचले, तरीही मयत विश्वनाथ घोरपडे याचे अंगावर जखमा असल्याचे व सदर जखमांमुळे त्यांचा मृत्यु झाल्याचे तेवढेच मात्र सिध्द होते. तरीही, सदर दोन्ही अहवाल पाहता, या जखमा आरोपी स्वाती घोरपडे व अर्जुन वाघे यांनी केल्याचे काडीमात्रही सिध्द होत नाही. अशा परिस्थितीत, मरनोत्तर पंचनामा नि. ३४ व शवविच्छेदन अहवाल नि. ३३ हे आरोपीं विरुध्द अभियोजन पक्षास जास्त उपयुक्त ठरत नाही.

२५. ज्याअर्थी, महत्वाचे तथाकथीत प्रत्यक्षदर्शी सा. क्र. १ कार्तिक व सा. क्र. ३ रावसाहेब व सा. क्र. ४ दादासाहेब यांनी तपासात दिलेले आपल्या आधीचे जबाबाशी अशी विसंगत साक्ष दिल्याने सदर जबाबातील व फिर्यादीतील मजकुर जरी ठाणे अंमलदार सा. क्र. ५ फटांगरे व तपासी अंमलदार व सा. क्र. ६ शिंदे यांच्या साक्षीमध्ये सिध्द झाले असेल तरीही, त्या जबाबांचे महत्व गौण होवून जाते व ते आरोपीविरुध्द अभियोजन पक्षास पुरक ठरत नाही. तसेच ज्याअर्थी वर नमुद साक्षीदार त्यांचे आधीचे जबाबाशी विसंगत अशी साक्ष दिल्याने, ठाणे अंमलदार सा. क्र. ५ फटांगरे व तपास अधिकारी सा. क. ६ शिंदे यांची साक्ष देखील औपचारीक होवुन जाते. करीता, या दोघांची साक्ष देखील आरोपींविरुध्द त्यांनी दोषारोपाप्रमाणे गुन्हा केल्याचे संशयापलीकडे सिध्द होत नाही.

२६. ज्याअर्थी, सा.क्र. १ कार्तिक, सा.क्र. २ वैष्णवी, सा.क्र. ३ रावसाहेब व सा. क्र. ४ दादासाहेब, यानी न्यायालयात साक्षीमध्ये फितूर होवून आपल्या आधीचे जबाब व फिर्यादीशी विसंगत अशी साक्ष दिल्याने, आरोपींनी त्यांच्यावर निश्चित करण्यात आलेले दोषारोपाप्रमाणे गुन्हा केल्याचे एकही तथ्य किंवा दोष सिध्द होत नाही. अशा परिस्थितीत आरोपी यांनी गुन्हा केल्याचे सिध्द होत नसल्याने, अशा फितुर साक्षींवर आधारीत राहुन, त्यांनी गुन्हा केल्याचे सिध्द झाले असे म्हणता येणार नाही व त्यांना शिक्षा देणे न्यायोचित होणार नाही.

२७. महत्वाचे साक्षीदार हे फितुर झाल्याने अभियोजन पक्षाने दिनांक १८/१०/२०२१ रोजी, रात्री ११:०० ते ११:३० वाजता सुमारास, मयत विश्वनाथचे घरात, जाभंळी मळा, निर्मल पिंप्री गावात, ता. राहाता, जि. अहमदनगर येथे, आरोपी क्र. १ व २ ने समान उद्देशाने संगनमत करुन, मयत विश्वनाथ सखाराम घोरपडे यास लोखंडी बाजला बांधुन, त्यांच्या पायावर लाकडी दांडयाने मारहाण करुन मनुष्यवध करुन खुन या सदरात न मोडणारा अपराध केल्याचे व मृत्यु होणे इतपत गंभीर दुखापत केल्याचे, आरोपींविरुध्दचे अभियोजन निष्फळ होत असल्याने, त्यांच्या विरुध्द कुठलाही दोषारोप सिध्द झाल्याचे गृहीत धरता येणार नाही व त्यांना शिक्षाही देता येणार नाही. या कारणास्तव, आरोपींविरुध्दचे निश्चीत केलेले दोषारोप सिध्द होत नसल्याने, आरोपीं निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. म्हणून, **उर्वरीत दोन्ही मुद्दयांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.**

२८. वरील विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, अभियोग पक्ष संशयापलीकडे, आरोपींविरुध्द गुन्हा शाबित करण्यास असमर्थ झाले आहेत. म्हणून दोन्ही आरोपीं निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. परीणामी खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे -

: **आ दे श** :

१. आरोपी क्र. १ स्वाती विश्वनाथ घोरपडे व आरोपी क्र. २ अर्जुन लक्ष्मण वाघे यांची फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २३५(१) नुसार भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३०४ व ३२६ सहकलम ३४ प्रमाणेच्या आरोपांतून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे बंधपत्र रद्द करण्यात येऊन, त्यांना मुक्त करण्यात येत आहे.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी, आरोपींनी, मा. अपीलीय न्यायालयामध्ये हजर होणे कामी, स्वत:चे व जामीनदाराचे प्रत्येकी रुपये १५,०००/- चे बंधपत्र दाखल करावे. सदरचे बंधपत्र पुढील सहा महिने अंमलात राहील.

४. दोषारोपपत्रातील तक्ता क्र. १२ मधील अ. क्र. १ मध्ये नमुद मुद्देमाल एक लोखंडी बाज फिर्यादीचे घरातुन जप्त केल्याने, ते फिर्यादीने मागणी केल्यास या आदेशाच्या तारखे पासुन १ वर्षांनंतर त्याला परत करावे, फिर्यादीने मागणी न केल्यास सदर लोखंडी बाजचा नियमाप्रमाणे लिलाव करावा व प्राप्त रक्कम सरकार जमा करण्यात यावी, किंवा अपील झाल्यास, मा. अपीलीय न्यायालयाचे आदेशान्वये कार्यवाही करण्यात यावी.

९. दोषारोपपत्रातील तक्ता क्र. १२ मधील अ. क्र. २ ते १७ मध्ये नमुद आरोपींचे व मयताचे कपडे, हे मुल्यहिन असल्याने, या आदेशाच्या तारखे पासुन १ वर्षांनंतर नष्ट करण्यात यावे, किंवा अपील झाल्यास, मा. अपीलीय न्यायालयाचे आदेशान्वये कार्यवाही करण्यात यावी.

*न्यायनिर्णय खुल्या न्यायालय कक्षामध्ये घोषित करण्यात आला.*

YOGESH HEERALAL AMETA
Digitally signed by YOGESH HEERALAL AMETA
Date: 2025.03.12 18:00:52 +0530

(**यो. ही. आमेटा**)

दिनांक : ११/०३/२०२५.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
राहाता.

## परिच्छेद - १

## भाग-'क'

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष :**

| अनुक्रमांक | नांवे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१/ नि. २२ | कार्तिक विश्वनाथ घोरपडे, | फिर्यादी |
| सा.क्र.२/ नि. २६ | वैष्णवी विश्वनाथ घोरपडे, | मयताची मुलगी |
| सा.क्र.३/नि. २९ | रावसाहेब सखाराम घोरपडे, | मयताचा भाऊ |
| सा.क्र.४/नि. ३१ | दादासाहेब सखाराम घोरपडे, | मयताचा भाऊ |
| सा.क्र.५/नि. ३९ | सहा. फौज. सुदाम काशिनाथ फटांगरे, | ठाणे अंमलदार |
| सा.क्र.६/नि. ४४ | पो.उप.नि. योगेश बाबासाहेब शिंदे, | तपास अधिकारी. |

**ब. बचाव पक्ष :**

| अनुक्रमांक | नांवे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क. न्यायालयीन साक्षीदार :**

| अनुक्रमांक | नांवे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयीन निशाणीकृत दस्तांची यादी

**अ. अभियोग पक्षातर्फे दस्ताऐवज :**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १. | २३ | फिर्याद दि. १९.१०.२०२१ वर फिर्यादीची सही. |
| २. | २३अ | फिर्याद दि. १९.१०.२०२१ मधील अधोरखांकित भाग-अ चा मजकुर. |
| ३. | २४ | छापील नमुन्यातील फिर्याद दि. १९.१०.२०२१ वर फिर्यादीची सही. |
| ४. | २९ | मयताचे कपडे जप्ती पंचनामा. |

| | | |
|---|---|---|
| ५. | ३० | प्रेत वारसाचे ताब्यात दिल्याची पावती. |
| ६. | ३१ | आरोपीचे कपडे जप्ती पंचनामा. |
| ७. | ३२ | घटनास्थळ पंचनामा. |
| ८. | ३३ | शवविच्छेदन तपासणी अहवाल. |
| ९. | ३४ | मरनोत्तर पंचनामा. |
| १०. | ४० | पोलीस ठाण्यातील कार्यालयीन आदेश दि. १९. १०.२१. |
| ११ | ४५ | वैद्यकिय अधिकारी, प्रवरा रुग्णालय यांना शवविच्छेदन अहवालासाठी तपासी अधिकारी यांनी दिलेले पत्र दि. १९.१०.२१. |
| १२ | ४६ | जप्त केलेले वस्तु मुददेमाल कारकुणाकडे जमा केल्याची पावती. |
| १३ | ४७ | मयताचे जप्त केलेले कपडे मुददेमाल कारकुणाकडे जमा केल्याची पावती. |
| १४ | ४८ | आरोपी स्वातीचे जप्त केलेले कपडे मुददेमाल कारकुणाकडे जमा केल्याची पावती. |
| १५ | ४९ | आरोपी अर्जुनचे जप्त केलेले कपडे मुददेमाल कारकुणाकडे जमा केल्याची पावती. |
| १६ | ५० | साक्षीदार रावसाहेब घोरपडे याचा जबाब दि. २०. १०.२१ मधील अधोरेखांकित भाग अ चा मजकुर. |
| १७ | ५१ | साक्षीदार दादासाहेब घोरपडे याचा जबाब दि. २०. १०.२१ मधील अधोरेखांकित भाग अ चा मजकुर. |
| १८ | ५२ | जप्त मुददेमालाचे तपासणीकामी प्रयोगशाळा, नाशिक यांना दिलेले पत्र. |
| १९ | ५३ | मयताचे व्हिसेरा तपासणीकामी प्रयोगशाळा, नाशिक यांना दिलेले पत्र. |
| २० | ५४ | संबंधित मोबाईलचे सीडीआर/एसडीआर मिळणेकरीता अप्पर पोलीस अधिक्षक, श्रीरामपुर यांना दिलेले पत्र. |
| २१ | ५५ | घटनास्थळाचा ७/१२ उतारा. |
| २२ | ५६ | मयत विश्वनाथ विरुध्दची फिर्याद क्र. ४०९/२१ ची खरी नक्कल. |
| २३ | ५७ | फिर्यादी कार्तिक याचा फौ.प्र.सं. कलम १६४ अन्वयेचा जबाब. |

| | | |
|---|---|---|
| २४ | ५८ व ५९ | न्यायवैद्यकिय प्रयोगशाळा, नाशिक यांचेकडील तपासणी अहवाल. |

वर नमूद केलेले अ.क्र. ४ ते ९, वरील कागदपत्र, बचावपक्षातर्फे मान्य करण्यात आली असल्याने, सदर कागदपत्रांना निशाणी देण्यात आले.

**ब. बचाव पक्षातर्फे दस्ताऐवज :**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क. न्यायालयीन दस्ताऐवज :**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड. महत्वाचे वस्तू (Material Objects) :**

| अनुक्रमांक | वस्तू क्रमांक | वस्तूंचे वर्णन |
|---|---|---|
| १. | घटनास्थळी असलेले प्रेताचे एकुण ८ फोटो. | आर्टिकल एमओ-१ ते एमओ-८. |

YOGESH HEERALAL AMETA
Digitally signed by YOGESH HEERALAL AMETA
Date: 2025.03.12 18:00:39 +0530

**(यो. ही. आमेटा)**

दिनांक : ११/०३/२०२५.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
राहाता.